सरसेनापती संताजी घोरपडे यांचे स्मारक मौजे कापशी (सेनापती) ता. कागल,जि. कोल्हापूर येथे उभारण्यास निधी मंजूर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांकः स्मारक ३११०/८६१/प्र.क्र.१३७/२९
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
तारीख : २१ मार्च, २०१८

वाचा :-

१. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. स्मारक ३३१०/८६५/प्र.क्र.१३७/२९,दि.२५ नोव्हेंबर, २०१०
२. शासन शुध्दीपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्र.स्मारक ३३१०/८६५/प्र.क्र.१३७/२९/दि. २४ नोव्हेंबर, २०११
३. जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचे पत्र क्रमांक कार्या-७/गृह-१/आरआर/१३७३/१२, दि. २९ ऑगस्ट, २०१२
४. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.स्मारक३११०/८६५/प्र.क्र.१३७/२९,दि. ६मार्च, २०१३
५. जिल्हाधिकारी,कोल्हापूर यांचे पत्र क्रमांक नियो./कार्य-८/लेखा१७४४/२०१३, दि. २८ जून,२०१३
६. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.स्मारक३११०/८६५/प्र.क्र.१३७/२९,दि. ३१ जानेवारी, २०१४
७. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.स्मारक ३११०/८६५/प्र.क्र.१३७/२९, दि. २० जून, २०१४
८. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.स्मारक ३११०/८६५/प्र.क्र.१३७/२९, दि. १४ ऑक्टोबर, २०१७
९. जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचे पत्र क्रमांक कार्या-७/गृह-१/आर आर २२४६/२०१७, दि.९ नोव्हेंबर, २०१७

प्रस्तावना :

सरसेनापती संताजी घोरपडे यांचे स्मारक मौजे कापशी (सेनापती) ता. कागल,जि. कोल्हापूर येथे उभारण्यासाठी रु.१६७.२७ लाख इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास व आराखडयास शासनाने उपरोक्त संदर्भ क्रमांक (१) व (२) अन्वये प्रशासकीय मान्यता दिली असून त्यानुषंगाने स्मारकाच्या कामासाठी उपरोक्त संदर्भ क्र. ४,६,७ व ८ येथे नमूद शासन निर्णयान्वये अनुक्रमे रु. १७.२९ लाख, रु.४५.०० लाख, रु. ५०.०० लाख व रु.५०.०० लाख असा एकूण १६२.२९ लाख इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सदर स्मारकासाठी रु.७.७१ लाख इतका निधी उपलब्ध करुन देण्याबाबत जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी संदर्भिय क्र.९ च्या पत्रान्वये मागणी केली असून सदर निधी वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

मौजे कापशी (सेनापती) ता.कागल, जि.कोल्हापूर येथे सरसेनापती संताजी घोरपडे यांच्या स्मारकाच्या बांधकामासाठी प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेत रु. ४.९८ लाख (अक्षरी रुपये चार लाख अठ्ठयाण्णव हजार फक्त) इतकी रक्कम मंजूर करण्यात येत असून सदर निधी जिल्हाधिकारी,कोल्हापूर यांचेकडे सुपूर्द करण्यात येत आहे.

२. सदरचा निधी वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं २०१७/ प्र.क्र. ७५/ अर्थसंकल्प-३, दि.१८ एप्रिल,२०१७ मधील परि.१४ नुसार ठेव बांधकामाच्या स्वरुपात सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग न करता चालू वर्षी या कामावर खर्ची घालण्याची जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी दक्षता घ्यावी.

३. सदरचा खर्च सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात मंजूर असलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा व तो खालील लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

मागणी क्रमांक -ए-४,
मुख्य लेखाशीर्ष, २०५९, सार्वजनिक बांधकामे,

(८०) सर्वसाधारण
(८००) इतर खर्च
(००)(०३) राष्ट्रपुरूष/थोर व्यक्ती यांची स्मारके व पुतळे यांचे बांधकाम
योजनेतर (२०५९ ३२०१),
२७ - लहान बांधकामे

४. उपरोक्त निधीमधून खर्च करण्यासाठी प्रमुख लिपिक, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर (सांकेतांक क्रमांक २६०१०००९४८) यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. सदर स्मारकाच्या खर्चाची जबाबदारी जिल्हाधिकारी,कोल्हापूर यांची राहील. त्यांनी निधीच्या उपयोगितेसंबंधीची माहिती उपयोगिता प्रमाणपत्रासह वेळोवेळी शासनास सादर करावी व महालेखापालांच्या लेख्याशी खर्चमेळाबाबतची कार्यवाही करावी.
५. हा शासन निर्णय वित्तीय अधिकार नियमपुस्तिका १९७८,भाग पहिला,उपविभाग पाच मधील अनुक्रमांक-१,महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम विभाग नियम पुस्तिकेतील परिच्छेद क्रमांक १३४ अनुसार व वित्त विभागाचे परिपत्रक क्र.अर्थसं २०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३,दिनांक १८ एप्रिल,२०१७ मधील परिच्छेद ७ (क) व परिच्छेद ८ अनुसार प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२११४०५२५४२०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Mahesh Kisan Wavhal

Digitally signed by Mahesh Kisan Wavhal
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400027, st=Maharashtra, 2.5.4.20=20283e5186ccca8f0350182971072649a1b738829e2db98425839104e8e271f1, cn=Mahesh Kisan Wavhal
Date: 2018.03.21 18:01:41 +05'30'

(म.कि. वाव्हळ)
अवर सचिव,महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा.पालकमंत्री, जिल्हा कोल्हापूर, कोल्हापूर,
४. प्रधान सचिव (र.व का.), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,
५. सचिव, (बांधकामे) सार्वजनिक बांधकाम विभाग,मंत्रालय,मुंबई,
६. विभागीय आयुक्त, पुणे.
७. जिल्हाधिकारी, कोल्हापूर,
८. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई,
९. महालेखापाल -१ (लेखापरिक्षा), मुंबई.
१०.जिल्हा कोषागार अधिकारी, कोल्हापूर,
११.सहसंचालक, लेखा व कोषागारे,संगणक कक्ष,५ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई.
१२.निवासी उपजिल्हाधिकारी,कोल्हापूर,

१३.कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग (पश्चिम),कोल्हापूर,
१४.कक्ष अधिकारी (कार्यासन व्यय- ४/अर्थसंकल्प-१४), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
१५.कक्ष अधिकारी (कार्या-२५), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१६.निवडनस्ती कार्यासन २९, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई